**सं.फौ.ख.क्र. १०१२/२०१९**
शासन वि. दत्तात्रय तांबे
**निशाणी क्र. ५३ लगत**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ चा पुढील सरतपास शपथेवर सुरू :</u>**
**<u>सरतपासणी</u> — <u>अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदम:</u>**

**२.** सन २०१९ मध्ये मी तहसिलदार म्हणुन शिरूर येथे कार्यरत होतो. तसेच मी शिरूर लोकसभा मतदार संघाचा अतिरीक्त सहाययक निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहाययक मतदार नोंदणी अधिकारी म्हणुन कार्यरत होतो. दिनांक ०८/०३/२०१९ रोजी शिक्रापुर येथील जिल्हा परिषद शाळेतील ९ शिक्षकांना मतदान केंद्र स्तरीय अधिकारी म्हणुन नियुक्ती केली होती. त्यासाठी त्यांना नियुक्तीचे आदेश दिले होते. त्या आदेशाप्रमाणे दिनांक १३/०३/२०१९ रोजी आपल्या केंद्राची मतदार यादी ताब्यात घेणे, मतदार केंद्र निहाय सुविधाची माहिती देणे आणि दिनांक १६/०३/२०१९ ला मयत, दुबार व स्थलांतर मतदारांची यादी तयार करणे आणि दिनांक ३०/०३/२०१९ रोजीला मतदारांना मतदार ओळखपत्र वाटप करणे असे कर्तव्य दिले होते.

**३.** एकुण ९ शिक्षकांपैंकी ७ शिक्षकांनी दिनांक १३/०३/२०१९ रोजी आम्ही सन २०१८ रोजीचे बी.ल.ओ. आदेश नाकारलेले आहेत त्यामुळे सदरच्या आदेशानुसार आम्ही काम करणार नाही असे लेखी कळविले. त्यानंतर मी दिनांक १३/०३/२०१९ रोजी ९ शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस दिली. त्या नोटीसवर ९ शिक्षकांनी कुठलाही खुलासा दिलेला नाही. नमुद ९ शिक्षकांनी त्यांनी दिनांक ०८/०३/२०१९ रोजीच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे सदरच्या ९ शिक्षकांवर भारतीय लोकप्रतिधी अधिनियम १९५१ कलम १३४ प्रमाणे तक्रार दाखल करण्याकरीता गावकामगार तलाठी, शिक्रापुर यांना माझा आदेश दिनांक १८/०४/२०१९ प्रमाणे प्राधिकृत केले. तो आदेश आता मला दाखविला. त्या आदेशावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो आदेश अगोदरच निशाणी ४८ वर आहे.

**<u>उलटतपास</u>: <u>आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. जी. ई. दरेकर :</u>**

**४.** हे मला सांगता येत नाही की, दिनांक ०८/०३/२०१९ रोजीचा आदेश

आरोपी यांना पाठविला याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. हे मला सांगता येत नाही की, आरोपी यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८/०३/२०१९ रोजीच्या आदेशामध्ये मयत, दुबार व स्थलांतर मतदारांची यादी तयार करणे आणि दिनांक ३०/०३/२०१९ रोजीला मतदारांना मतदार ओळखपत्र वाटप करणे असे नमुद नाही.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८/०३/२०१९ रोजीचा आदेश व कारणे दाखवा नोटीस आरोपींना मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी निवडणुकीचे कामकाज करण्यास कधीही नकार दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना निवडणुकीचे कामकाज करण्याबाबतचा आदेश मी पारीत केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित दिनांक ०८/०३/२०१९ रोजीच्या आदेशापुर्वी आरोपी यांच्याकडे कोणते कामकाज होते याबाबत चौकशी केली नाही. हे मला माहिती नाही की, आरोपी यांना उपजिल्हाधिकारी यांनी निवडणुकीबाबत काम दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी निवडणुकीबाबत कामकाज करणार नाही असे मला लेखी कळविले होते हे मी खोटे सांगितले. हे मला सांगता येत नाही की, आरोपी यांनी निवडणुकीचे कामकाज न करण्याबाबत कळविलेले पत्र मी पोलिसांना दिले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी शासकीय कर्तव्य पार पाडण्यास कसुर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गावकामगार तलाठी, शिक्रापुर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला. फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
2025.12.15 15:44:18 +0530

ठिकाण : घोडनदी.
दिनांक : १५/१२/२०२५.

**(एस. डी. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता. शिरूर, जि. पुणे